# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी — ३०२३३४२४, ३०२३३४३४, ३०२३३४७३ फॅक्स - २२६९२१०२.
तार - edutech E-mail : dtedesk4a@gmail.com Internet :http/www.dte.org.in


क्रमांक : ४अ/आस्था/कॅस/२०१४/ ९८२
दिनांक : 5 APR 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
बांद्रा, मुंबई

**विषय : दिनांक १९.०८.२०१० पर्यत पात्र ठरणाऱ्या अध्यापकांची वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणी प्रकरणे व कॅस अंतर्गतची अन्य प्रकरणे निकाली काढण्याबाबत.**

संदर्भ :- संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.४अ/आस्था/कॅस/२०१२/ २६५८ दि.०४.०४.२०१२

उपरोक्त विषयाबाबत आपल्या अधिपत्याखालील शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र महाविद्यालय व तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांमधील दि.१९.०८.२०१० पर्यंत पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत वरिष्ठ श्रेणी /निवड श्रेणी वेळोवेळी प्रदान करण्यात आलेली आहे. परंतू आपल्या अधिपत्याखालील काही पदवी/ पदविका संस्थांमधील अध्यापकांचा परिविक्षा कालावधी पूर्ण नसणे, पूर्वसेवेला मान्यता नसल्यामुळे पूर्वसेवा ग्राहय न होणे, विहीत कालावधीतील उजळणी वर्गाची कागदपत्रे सादर केलेली नसणे, नियुक्तीला मान्यता नसणे, प्रतिनियुक्तीवर असल्यामुळे प्रस्ताव सादर करण्यास विलंब होणे इत्यादि कारणास्तव वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी प्रदान करण्यात आलेली नाही.

उपरोक्त वस्तुस्थितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील पदवी / पदविका संस्थामधील उपरोक्त परिच्छेदात नमुद कारणास्तव दि.१९.०८.२०१० पर्यंत पात्र अध्यापकांची प्रलंबित असलेली प्रकरणे मागवून (पाचव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार) छाननी करुन संदर्भाधीन कार्यालयीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीच्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह दि.१५.०४.२०१४ पर्यंत संचालनालयास सादर करण्यात यावेत.

पदवी व पदविका संस्थांसाठी स्वतंत्र कार्यवाही करुन पदवी संस्थांचे प्रस्ताव कार्यासन क्रमांक ४ व पदविका संस्थांचे प्रस्ताव कार्यासन क्रमांक ४ अ कडे लक्षवेध करुन सादर करण्यात यावेत.

(डॉ सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

आ.१

**अतितात्काळ**

**पृ.पत्र जा.क्र.विकाऔ/आस्था-१/२०१४/ २९८३**
**दिनांक : ०९/०४/२०१४**

**प्रति,**
**प्राचार्य**
**सर्व शासकीय संस्था**
**सर्व अशासकीय अनुदानित संस्था**

**यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील दिनांक १९/८/२०१० पर्यंत पात्र अध्यापकांची प्रलंबित कॅस अंतर्गत वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी लागू करण्याबाबतची माहिती विहीत कागदपत्रासह या कार्यालयास दिनांक ११/०४/२०१४ पर्यंत सादर करण्यात यावी.**

**( महेश शिवणकर )**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.**